**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१**
**प्रशासन विभाग**

क्र.प्र./आस्था-५१ /अभ्यागत प्रवेश/१००८ /२०२३, दिनांक : 2 8 JUN 2023

**: परिपत्रक :**

प्राधिकरणाच्या आवारात कार्यालयीन कामाकरीता बाहेरुन येणाऱ्या सर्व अभ्यागंताना कार्यालयात प्रवेश करताना त्यांच्याकडून कागदोपत्री पुरावा (आधारकार्ड/ पॅन कार्ड/ निवडणूक ओळखपत्र/ वाहनचालक परवाना यापैकी कोणताही एक) तपासणे तसेच ते कोणत्या कामासाठी कोणत्या अधिकारी/कर्मचाऱ्यास भेटण्यासाठी कार्यालयात आलेले आहेत याबाबतची माहिती लिखीत स्वरुपात अभ्यागत नोंदवहीत नोंद करणे बंधनकारक राहील.

२. प्राधिकरणाच्या कार्यालयात अभ्यागतांची कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भेटण्याची वेळ दुपारी ३:०० ते सायंकाळी ५:०० राहील.

३. बाहेरुन येणाऱ्या अभ्यागतांचा भेटीचा उद्देश केवळ मा. महानगर आयुक्त/ अति. महानगर आयुक्त / सह महानगर आयुक्त यांचे कार्यालय तसेच संबंधीत विभाग/ पथक/ कक्ष प्रमुख यापुरताच असेल. ज्या व्यक्तीस कार्यालयात अर्ज, पत्र, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज सादर करणे आणि इतर टपाल दयावयाचे असल्यास प्राधिकरणाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावरील मध्यवर्ती आवक-जावक कक्षात जमा करावित. कार्यालयीन कामाव्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कार्यालयात अधिकारी/कर्मचारी यांना भेटण्यास परवानगी दिली जाणार नाही.

४. प्राधिकरणाच्या विविध विभागामार्फत बैठका आयोजित करण्यात येतात. सदर बैठकीकरीता बाहेरील व्यक्ती उपस्थित राहणार असतील तर त्याचा तपशील बैठकीच्या १ दिवस आधी सुरक्षा पर्यवेक्षकांना देणे आवश्यक राहील.

५. सर्व विभाग/ पथक/कक्ष प्रमुख यांनी याबाबतची नोंद घ्यावी तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.

**सह महानगर आयुक्त**

**प्रत अग्रेषित :**

१. सर्व विभाग / पथक/ कक्ष प्रमुख
२. मा. महानगर आयुक्त यांचे स्वीय सहायक
३. मा. अति. महानगर आयुक्त-१ यांचे स्वीय सहायक
४. मा. अति. महानगर आयुक्त-२ यांचे स्वीय सहायक
५. मा. सह महानगर आयुक्त यांचे स्वीय सहायक